02-05-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 5/1/2025 10:42 PM Page 1



कामगारांचे शोषण चालू देणार नाही पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



सनरायझर्स हैदराबादसाठी आज 'करो या मरे' पान ४ वर

वेर्णा, शुक्रवार, २ मे २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 239 | Verna, | facebook.com/dainikherald | Friday 2 May 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### मेहुल चोक्सीविरुद्ध अजामीनपात्र वॉरंट

**मुंबई, दि. १ :** कॅनरा बँकेच्या नेतृत्वाखालील कन्सोर्टियम कर्ज घोटाळ्या प्रकरणी मुंबई दंडाधिकारी न्यायालयाने हिरे व्यापारी मेहुल चोक्सीविरुद्ध अजामीनपात्र वॉरंट जारी केले आहे. सुमारे ५५ कोटी रुपयांचा कर्ज घोटाळा केल्याचा चोक्सीवर आरोप आहे. पंजाब नॅशनल बँक घोटाळा प्रकरणात मेहुल चोक्सी हा प्रमुख आरोपी असून १२ एप्रिल रोजी त्याला बेल्जियम येथून अटक करण्यात आली. पॅनरा बँक आणि बँक ऑफ महाराष्ट्र यांनी बेझेल ज्वेलरीला एका कन्सोर्टियम करारांतर्गत कार्यरत भांडवल सुविधा म्हणून अनुक्रमे ३० कोटी आणि २५ कोटी रुपये मंजूर केले होते. सोने व हिऱ्यांनी जडलेल्या दागिन्यांच्या निर्मिती आणि विक्रीसाठी हे कर्ज देण्यात आले होते, मात्र कंपनीने त्याचा वापर अन्य कारणांसाठी केला, असे सीबीआयचे म्हणणे आहे.

-----------------

### व्यावसायिक सिलिंडर १४ रुपयांनी स्वस्त

**नवी दिल्ली, दि. १ :** १९ किलोचा व्यावसायिक एलपीजी सिलिंडर आता १४.५ रुपयांनी स्वस्त झाला आहे. पण, एप्रिलमधील शेवटच्या बदलापासून घरगुती एलपीजीच्या किमती जैसे थे आहेत. सध्या घरगुती वापराच्या १४.२ किलो वजनाच्या सिलिंडरच्या किमतीत कोणताही बदल करण्यात आलेला नाही. पण १९ किलोच्या व्यावसायिक सिलिंडरच्या किमतीत कपात केली आहे. १ मे रोजी गॅसच्या किमतीतील बदलानुसार, आता राजधानी दिल्लीत १९ किलोच्या गॅस सिलिंडरसाठी १७४७.५० रुपये द्यावे लागतील. गेल्या एप्रिल महिन्यात याचा दर १७६२ रुपये आणि मार्चमध्ये १८०३ रुपये होता. म्हणजेच १९ किलोच्या गॅस सिलिंडरची किंमत दोन महिन्यांत ५५.५ रुपयांनी कमी झाली आहे. तर एका महिन्यात सिलिंडर १४.५ रुपयांनी कमी झाली आहे.

-----------------

### रामदेवबाबांना अवमान नोटीस

**नवी दिल्ली, दि. १ :** योगगुरू बाबा रामदेव यांनी रुफ अफजाला शरबत जिहाद म्हटले होतं. यावरून उच्च न्यायालयाने बाबा रामदेव यांचे कान टोचले आहेत. तसेच कोर्टाने रामदेव यांच्या विरोधात कोर्टाचा अवमान केल्याचीही नोटीस पाठवली आहे. दिल्ली उच्च न्यायालयाने बाबा रामदेव यांना कोर्टाचा अवमान केल्याप्रकरणी दोषी ठरवलं आहे. बाबा रामदेव यांनी रुफ अफजाला शरबत जिहाद म्हटले होते. याविरोधात कंपनीने बाबा रामदेव यांच्याविरोधात केस केली होती. कोर्ट म्हणाले की बाबा रामदेव कुणाच्याच नियत्रंणात नाहीत, ते वेगळ्याच दुनियेत वावरतात. बाबा रामदेव यांनी ३ एप्रिल रोजी पतंजली सिरप लाँच केले होते. त्यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स वर म्हटले होते की एक कंपनी सरबत बनवते. यातून मिळणाऱ्या पैशातून ती मदरसे आणि मशिदी बांधते. बाबा रामदेव म्हणाले होते की ज्याप्रमाणे लव्ह जिहाद आणि व्होट जिहाद चालू आहेत, त्याचप्रमाणे शरबत जिहाद देखील चालू आहे. रुह अफजा सिरप बनवणारी कंपनी हमदर्दने या विरोधात दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

-----------------

### कॅ. शुभांभू शुक्ला २९ रोजी अंतराळात

**नवी दिल्ली, दि. १ :** भारतीय वायुदलाचे ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला हे २९ मे रोजी अंतराळात झेप घेणार आहेत. अमेरिकेची स्पेस एजन्सी नॅशनल एरोनॉटिक्स अँड स्पेस ॲडमिनिस्ट्रेशन (नासा), हिंदुस्थानी अंतराळ विज्ञान संघटन (इस्रो) आणि युरोपीय अंतराळ एजन्शी (ईएसए) यांनी मिळून स्पेस मिशन ॲक्सिओम ४ हे मिशन जाहीर केले होते. आता या मिशनची तारिख ठरली असून २९ मे रोजी ते उड्डाण घेणार आहेत. भारतीय वायू दलाचे ग्रुप कॅप्टन आणि अंतराळवीर शुभांशू शुक्लाच्या रुपाने चार दशकानंतर आंतरराष्ट्रीय अंतराळ स्टेशनवर पाठवण्याचा निर्णय झाला आहे, अशी माहिती काही दिवसांपूर्वी केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली.

# भारताकडून पाकिस्तानसाठी अखेर हवाई क्षेत्र बंद

## 'नोटम' जारी : लष्करी विमानांवरही बंदी लागू

**नवी दिल्ली, दि. १ :**

**पहलगाम येथे नुकत्याच झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत-पाकिस्तान संबंधांमध्ये वाढलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, भारताने पाकिस्तानसाठी आपले हवाई क्षेत्र बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. ही कारवाई १ मेपासून २३ मे २०२५ पर्यंत लागू राहणार असून, यासंदर्भात भारतीय विमानतळ प्राधिकरणाने बुधवारी संध्याकाळी 'नोटम'जारी केली आहे.**

या निर्बंधांनुसार, पाकिस्तानमध्ये नोंदणीकृत, तसेच पाकिस्तानी एअरलाइन्स आणि ऑपरेटर्सच्या मालकीची किंवा भाडेतत्त्वावर चालवली जाणारी कोणतीही विमाने भारतीय हवाई क्षेत्रातून प्रवास करू शकणार नाहीत. अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, ही बंदी पाकिस्तानच्या लष्करी विमानांवरही लागू होईल.

भारत आणि पाकिस्तान यांच्यात सध्या थेट विमानसेवा नाही. मात्र, पाकिस्तानी विमान कंपन्या भारताचे हवाई क्षेत्र पार करत सिंगापूर, मलेशिया तसेच इतर पूर्व आशियाई देशांमध्ये उड्डाण करत असतात. त्यामुळे या बंदीचा त्यांना थेट फटका बसणार आहे.



२३ एप्रिल रोजी, पहलगाम हल्ल्यानंतर केवळ एका दिवसात भारताने पाकिस्तानविरोधात कठोर भूमिका घेतली. यामध्ये सिंधू पाणी करार 'स्थगित' करणे, अटारी सीमावर्ती एकमेव कार्यरत जमीन मार्ग बंद करणे तसेच राजनैतिक संबंधांमध्ये कपात करणे यांचा समावेश होता.

या कारवाईच्या प्रत्युत्तरादाखल, पाकिस्तानने देखील भारतीय विमानांसाठी आपले हवाई क्षेत्र बंद केले असून, तिसऱ्या देशांमार्फत भारताशी होणारा सर्व व्यापार थांबवला आहे. पाकिस्तानने इशारा दिला आहे की, जर भारताने सिंधू नदीच्या पाण्याचा प्रवाह थांबवण्याचा अथवा वळवण्याचा प्रयत्न केला, तर तो 'युद्धासारखाच' समजला जाईल.

पहलगाम हल्ल्यानंतर अमेरिका आणि चीन या दोन प्रमुख जागतिक शक्तींनी आपापली प्रतिक्रिया नोंदवली आहे. अमेरिकेचे संरक्षण सचिव पीट हेगसेथ यांनी गुरुवारी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्याशी दूरध्वनीद्वारे चर्चा केली. त्यांनी निष्पाप नागरिकांच्या मृत्यूबद्दल शोक व्यक्त करत भारताच्या दहशतवादाविरोधातील लढ्याला पूर्ण पाठिंबा दर्शवला.

राजनाथ सिंह यांनी या संवादात स्पष्ट केले की, पाकिस्तान दहशतवादी संघटनांना पाठिंबा, प्रशिक्षण आणि निधी पुरवत असून संपूर्ण प्रदेशाला अस्थिर करत आहे. दहशतवाद हे मानवीतेविरुद्धचे गुन्हे आहेत आणि आंतरराष्ट्रीय समुदायाने याविरोधात एकत्रित आणि ठोस भूमिका घेणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.

दरम्यान, चीनचे पाकिस्तानमधील राजदूत जियांग झेडोंग यांनी इस्लामाबादमध्ये पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांची भेट घेतली. दक्षिण आशियातील शांतता आणि स्थैर्यासाठी चीन पाकिस्तानच्या पाठीशी उभा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शाहबाज शरीफ यांनी चीनच्या या भूमिकेचे स्वागत करत, पाकिस्तान दहशतवादाविरोधात नेहमीच उभा राहिला आहे आणि त्यासाठी आम्ही मोठ्या प्रमाणात नुकसान सोसले आहे, असे सांगितले. याआधी चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांनी पाकिस्तानचे उपपंतप्रधान इशाक दार यांच्याशी संवाद साधत, जम्मू आणि काश्मीरमधील वाढत्या तणावावर चीनचे लक्ष असल्याचे स्पष्ट केले होते.

# एअर इंडियाला ६०० दशलक्ष डॉलर्सपर्यंत नुकसानाची शक्यता

**नवी दिल्ली, दि. १ :**

पाकिस्तानने भारतीय विमान कंपन्यांसाठी आपले हवाई क्षेत्र बंद केल्यामुळे एअर इंडियाला सुमारे ६०० दशलक्ष डॉलर्सपर्यंतचा अतिरिक्त खर्च करावा लागू शकतो, अशी माहिती वृत्तसंस्था रॉयटर्सने एअर इंडियाने सरकारला पाठवलेल्या पत्राच्या आधारे दिली आहे.

या पत्रात नमूद करण्यात आले आहे की, पाकिस्तानकडून हवाई मार्ग बंद ठेवण्याचा निर्णय पुढील वर्षभर कायम राहिल्यास, बदललेल्या मार्गामुळे जास्त उड्डाण वेळ आणि वाढलेला इंधन खर्च यामुळे कंपनीचे आर्थिक नुकसान अधिकच वाढू शकते. याचा थेट परिणाम प्रवाशांच्या प्रवास वेळेवरही होणार असल्याचे कंपनीने स्पष्ट केले आहे.

एअर इंडियाने सरकारकडे या परिस्थितीमुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानीसाठी सवलती किंवा अनुदान देण्याची विनंती केली आहे. पत्रात म्हटले आहे की, स्थिती सामान्य झाल्यानंतर हे अनुदान मागे घेता येईल. एअर इंडिया किंवा नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने या अहवालावर अद्याप अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही.

पाकिस्तानकडून हवाई क्षेत्र बंद ठेवण्याचा निर्णय मुख्यतः भारतातील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर घेतलेल्या राजनैतिक आणि सुरक्षाविषयक उपाययोजनांचा एक भाग मानला जात आहे. या हल्ल्यानंतर भारत सरकारने दहशतवाद्यांना आणि त्यांच्या समर्थनार्थ असलेल्या घटकांना प्रतिउत्तर देण्याचा निर्धार व्यक्त केला होता.

रॉयटर्सने दिलेल्या माहितीनुसार, विमान वाहतूक मंत्रालय या निर्णयाचा विमान कंपन्यांवरील परिणाम कमी करण्यासाठी विविध पर्यायांचा विचार करत आहे. यामध्ये लांब पल्ल्याच्या उड्डाणांसाठी अतिरिक्त वैमानिकांच्या तैनातीला परवानगी देणे, कर सवलती देणे, तसेच ओव्हरफ्लाइट क्लिअरन्ससाठी चीनसोबत सहकार्य वाढवण्याच्या पर्यायांचाही समावेश आहे. एअर इंडियाव्यतिरिक्त, इंडिगो सारख्या इतर कंपन्यांनाही याचा काही प्रमाणात फटका बसत आहे. उदाहरणार्थ, दिल्लीहून अझरबैजानच्या बाकू शहरासाठी गुरुवारी झालेले उड्डाण सुमारे पाच तास ४३ मिनिटे उशिरा पोहोचले. मात्र, पाकिस्तानच्या हवाई क्षेत्रावर अधिक अवलंबून असलेल्या एअर इंडियाला सर्वाधिक परिणाम सहन करावा लागत आहे.

सध्या एअर इंडिया आणि तिची उपकंपनी एअर इंडिया एक्सप्रेस, तसेच इंडिगो या कंपन्यांनी एप्रिल महिन्यात नवी दिल्लीहून युरोप, मध्यपूर्व आणि उत्तर अमेरिकेतील गंतव्यांकडे एकूण १,२०० उड्डाणे केली आहेत. एअर इंडियाला आधीच आर्थिक तणावाचा सामना करावा लागत असून, २०२३-२४ या आर्थिक वर्षात कंपनीने ५२० दशलक्ष डॉलर्सचा निव्वळ तोटा नोंदवला आहे.

# बायको दारू पिते म्हणून केला निर्घृण खून

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि. १ :** येथे घडलेल्या एका धक्कादायक घटनेत पतीने पत्नीची लाकडी काठी व बेल्टने अमानुष मारहाण करून हत्या केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी मुंगूळ येथील रहिवासी कृष्णा रॉय याला पोलिसांनी अटक केली आहे.

उपलब्ध माहितीनुसार, मृत महिला करिश्मा रॉय (वय अंदाजे ३५) आणि तिचा पती कृष्णा रॉय हे मूळचे पश्चिम बंगालमधील असून मागील तीन वर्षांपासून मडगावच्या मुंगूल भागात वास्तव्यास होते. पोलिसांच्या प्राथमिक चौकशीनुसार, पत्नी करिश्मा रॉय नियमितपणे मद्यपान करत असल्याच्या संशयावरून पती कृष्णा रॉयने तिला लाकडी काठी व पट्ट्याने बेदम मारहाण केली. या मारहाणीत तिचा जागीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच मडगाव पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळी पंचनामा करण्यात आला असून श्वान पथक व फिंगरप्रिंट तज्ज्ञांच्या सहाय्याने पुरावे गोळा करण्यात आले. संशयित आरोपी कृष्णा रॉयला अटक करण्यात आली आहे.

महिलेचा मृतदेह शवविच्छेदनासाठी गोमेकॉ (गोवा वैद्यकीय महाविद्यालय) येथे पाठवण्यात आला. शवविच्छेदन अहवालानुसार, मृत्यूचे मुख्य कारण डोक्याला झालेली तीव्र दुखापत असून शरीरावर अनेक ठिकाणी गंभीर जखमा असल्याचे निष्पन्न झाले आहे. या जखमा बोथट वस्तूने झालेल्या असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. अहवालात असेही नमूद आहे की, सर्व जखमा मृत्यूच्या वेळी ताज्या होत्या.

पान २ ▶

# कामगार संघटनांकडून कामगार कायद्यांवर कडाडून टीका

## स्वतंत्र आणि प्रभावी सुरक्षा उपायांची मागणी | महिलांच्या सुरक्षेबाबतही नवीन संहिता अपुरी

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि. १ :** आंतरराष्ट्रीय कामगार दिनाच्या निमित्ताने गोवा युनायटेड वर्कमेन युनियनने (आयटक) राज्यातील कामगारांना शुभेच्छा दिल्या असतानाच केंद्र सरकारच्या नव्या कामगार संहितेच्या निषेधार्थ १ मे हा दिवस 'काळा दिवस' म्हणून पाळण्याची घोषणा केली आहे. युनियनने या संहितांमुळे कामगारांचे संरक्षण कमकुवत होणार असल्याचा इशारा देत, गोवा राज्यासाठी स्वतंत्र आणि प्रभावी सुरक्षा उपायांची मागणी केली आहे.

गोवा युनायटेड वर्कमेन युनियनचे अध्यक्ष ओलेन्सियो सिमोईस यांनी सांगितले की, कामगार दिन हा सामान्यपणे कामगारांच्या योगदानाचा सन्मान करण्याचा दिवस असतो, मात्र यंदाचा दिवस नव्या कामगार संहितांमुळे काळवंडला आहे. त्यांच्या मते, हे कायदे मालकांना अधिक अधिकार देतात, कामगारांचे शोषण, बालमजुरीला उत्तेजन, महिला कामगारांच्या सुरक्षेची उपेक्षा, वेतन कपात आणि नोकराच्या हमीचे उच्चाटन यासारख्या समस्यांना कारणीभूत ठरू शकतात.

सिमोईस यांनी स्पष्ट केले की, केंद्र सरकारने मंजूर केलेल्या चार संहितांमध्ये वेतन संहिता (२०१९), औद्योगिक संबंध संहिता (२०२०), सामाजिक सुरक्षा संहिता (२०२०) आणि व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य व कार्यस्थिती संहिता (२०२०) जुन्या २९ कामगार कायद्यांचा समावेश केला आहे. त्यांनी यातील काही ऐतिहासिक कायद्यांचे उदाहरण देत सांगितले की, १९२६चा ट्रेड युनियन कायदा, १९३६ चा वेतन देयक कायदा आणि १९२३ चा कर्मचारी भरपाई कायदा यांची प्रभावीता कमी केली गेली आहे.

१३ स्वतंत्र सुरक्षा कायदे एका संहितेत समाविष्ट करून संपूर्ण सुरक्षा चौकटच दुर्बल करण्यात आली आहे, असे सिमोईस म्हणाले. त्यांनी यासोबतच 'भाड्याने घ्या आणि कामावरून काढा' या संस्कृतीला चालना देणाऱ्या व्यवस्थेवरही चिंता व्यक्त केली.

महिलांच्या सुरक्षेबाबतही नवीन संहिता अपुरी असल्याची टीका सिमोईस यांनी केली. त्यांच्या मते, औद्योगिक संबंध संहितेतील अस्पष्ट तरतुदींमुळे कामगार संघटनांची नोंदणीही धोक्यात आली आहे, ज्यामुळे संघटनांना कायदेशीर सन्मान नाकारला जातो.

गोवा युनायटेड वर्कमेन युनियनने हेही निदर्शनास आणून दिले की, कृषी आणि घरगुती क्षेत्रातील कामगार तसेच किरकोळ व्यवसाय व कार्यालयीन कर्मचारी या संहितांच्या कक्षेबाहेर आहेत. यामुळे राज्यातील हजारो कामगारांना कोणताही संरक्षित अधिकार लाभणार नाही, असे युनियनचे मत आहे. केंद्राचा केंद्रीकृत दृष्टिकोन गोव्याच्या स्वायत्ततेस बाधा आणतो आणि राज्याला स्वतःच्या गरजांनुसार कायदे करण्याची मुभा कमी करतो, असा आरोप त्यांनी केला.

पान २ ▶

# शिरगावच्या लईराई देवीचा आज जत्रोत्सव

## भाविकांचा महापूर लोटणार | मध्यरात्री अग्निदिव्य साकारणार

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**डिचोली, दि. १ :** लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या शिरगावातील लईराई देवीच्या सुप्रसिद्ध जत्रोत्सवाला उद्या शुक्रवारपासून ( दि. ५) सुरुवात होणार आहे. सकाळपासून दर्शनासाठी भाविकांची अलोट गर्दी होणार आहे. रात्री अग्निदिव्य साकारण्यात येणार असून होमकुंड रचून सज्ज झाले आहे. दर्शनासाठी पुढील पाच दिवसांची भाविकांचा महापूर लोटणार आहे. यानिमित्त शिरगाव सजले असून भाविकांच्या स्वागतासाठी सज्ज आहे.

अग्निदिव्यासाठी प्रसिद्ध असलेल्या या जत्रेनिमित्त पहाटेपासून भाविकांची तुडुंब गर्दी लोटते. दिवसभर विविध धार्मिकव पारंपरिक विधी होत असतात. हजारो व्रतस्थ धोंड सकाळपासून पवित्र देवीच्या तळीत स्नान करतील तसेच देवीचे दर्शन घेतील. मध्यरात्री रखरखत्या अग्नितून हजारो व्रतस्थ धोंड अग्नी दिव्य साकरणार असून हा सोहळा पाहण्यासाठी भाविकांची तुडुंब गर्दी लोटणार आहे.

दुसऱ्या दिवसापासून चार दिवस देवीचा कौलोत्सव सुरू होतो. यासाठी वेगवेगळ्या भागातून लाखो भाविक उपस्थिती लावतात. देवीचा कळस घरोघरी नेला जातो त्या ठिकाणी पूजा केली जाते. देवीचा कौल घेण्यासाठी हजारो लोक गर्दी करतात. अस्नोडा ते शिरगाव हा दोन किलोमीटर परिसरात दोन्ही बाजूला मोठ्या प्रमाणात मिठाई व इतर दुकानाची फेरी भरलेली आहे.

प्रशासन व देवस्थान समितीला पाच दिवस पूर्ण सहकार्य करावे, असे देवस्थानचे अध्यक्ष दीनानाथ गावकर यांनी केले आहे. भाविकांची संख्या प्रचंड असल्याने लोकांनी शिस्तीचे पालन पान २ ▶



**अग्निदिव्यासाठी होमकुंड रचण्यात आले आहे.**



**शिरगाव : जत्रोत्सवानिमित्त सजलेले लईराई देवीचे मंदिर.**

### मोगरीच्या कळ्यांचा सुगंध शिरगावात दरवळणार

**जत्रोत्सवात लईराई देवीला आवडणाऱ्या मोगरीच्या कळ्यांना मोठी मागणी असते. यातून लाखो रुपयांची उलाढाल होत असते. मोगरीच्या कळ्यांची विक्री सुरू झाली असून आगामी पाच दिवस मोगरीचा सुगंध संपूर्ण शिरगावात दरवळणार आहे. विविध भागातून शेकडो फुलविक्रेते दाखल झाले आहे.**

### मुख्यमंत्र्यांनी दिल्या शुभेच्छा

**मुख्यमंत्री डॉ प्रमोद सावंत यांनी देवी लईराईच्या सुप्रसिद्ध जत्रोत्सवानिमित्त भाविकांना उत्सवाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. देवीला चरणी नतमस्तक होताना गोमंतकीय जनतेला सुख समृद्धी उत्तम आयुष्य आरोग्य लाभावे प्रत्येक घरात समृद्धी मानवी जीवन समृद्ध व्हावे, अशा प्रकारच्या शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.**


